# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व विभाग व अधिविभाग प्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या अधिविभागास आवश्यक उपकरणांच्या खरेदीची प्रकिया सुलभ व जलदगतीने होण्याकरीता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. विभागाने प्रत्यक्ष आवश्यक असणा–या उपकरणांची गरज व त्याची हाताळणी याचा अभ्यास करावा.
2. रूपये 50 लाखापेक्षा जास्त किंमतींचे उपकरण खरेदीसाठी प्रस्ताव सादर करण्यापुर्वी संबंधित विभागाने Pre-bid बैठक आयोजित करण्यात यावी व या बैठकीसाठी विभागीय तांत्रिक समितीसह तांत्रिक समितीमधील सदस्यांचा समावेश असावा. सदरच्या बैठकीची जाहिरात वृत्तपत्रात द्यावी. तसेच विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावी.
3. ज्यावेळी रूपये 50 लाखापेक्षा जास्त किंमतींचे उपकरण खरेदीसाठी प्रस्ताव तांत्रिक समिती समोर सादर करण्यात येतील त्यावेळी Specification निश्चित करतेवेळी विभागाच्या सदस्यांनी उपस्थित रहाणे गरजेचे आहे.
4. ज्यावेळी रूपये 50 लाखापेक्षा जास्त किंमतींचे उपकरण खरेदीसाठी प्रस्ताव तांत्रिक समिती समोर सादर करण्यात आले आहेत अशा विभागांनी सर्व कागदपत्रे तांत्रिक समिती समोर सादर करणे आवश्यक आहे.
5. रूपये 50 लाखापेक्षा जास्त किंमतींचे उपकरण खरेदीसाठी प्रस्ताव सादर करण्यापुर्वी संबंधित विभागाने Pre-bid बैठक आयोजित करण्यात येईल अशावेळी ज्या पुरवठाधारकांनी यामध्ये भाग घेतला आहे अशा पुरवठाधारकांच्या स्वाक्ष–या घेण्यात याव्यात .

वित्त व लेखा अधिकारी

शिवाजी वि./भांडार / 191

दि. 17 DEC 2018

प्रत;– 1. सर्व विभाग प्रमुख/ सर्व अधिविभाग प्रमुख/संचालक/ समन्वयक.

2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसपंर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.

3. मा. कुलगुरू , मा. प्र–कुलगुरू , मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.

4. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या इंट्रानेटवर प्रसिध्द करण्यात यावे.